सामना

## चणा उत्पादनात कोकण विभागात नंबर वन

# पालघर जिल्हा हरभऱ्याच्या झाडावर

पालघर, दि. १ (प्रतिनिधी) – भाताचे कोठार म्हणून ओळख असलेल्या पालघर जिल्ह्यातील शेतकरी आता अन्य पिकांकडे वळले आहेत. या पारंपरिक पिकाऐवजी अन्य पिके घेण्यास या शेतकऱ्यांनी सुरुवात केली असून त्यांचे हे आधुनिक शेतीचे प्रयोग सर्वच तालुक्यांमध्ये यशस्वी झाले आहेत. त्यामुळे पालघर जिल्हा चणा उत्पादनात कोकण विभागात प्रथम आला आहे. जिल्ह्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवणाऱ्या सर्वच शेतकऱ्यांचा कोकण विभागीय स्तरावर गौरव करण्यात आला आहे.

कोकणातील शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीकडून आधुनिक शेतीकडे वळावे यासाठी शासनाच्या वतीने कोकण विभागीय पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा तीळ आणि हरभरा या पिकांसाठी घेण्यात आली होती. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील शेतकरी या स्पर्धेत सहभागी झाले होते. हरभरा उत्पादनात पालघर जिल्ह्यातील सहा शेतकऱ्यांनी या स्पर्धेत बाजी मारली आहे. हरभऱ्याचे सर्वाधिक उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये पांडुरंग झोले, पद्माकर तरे, शरद चौधरी, धनराज माळवी, गणेश दुमडा, अनिल पाटील यांचा समावेश आहे. या शेतकऱ्यांचा सन्मान सोहळा पालघर पंचायत समिती सभागृहामध्ये पार पडला. याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा भारती कामडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धराम सालीमठ, काशीनाथ तरकसे आदी उपस्थित होते.

Mumbai Edition
Jul 2, 2021 Page No. 6
Powered by : eReleGo.com